तारुण्यसुलभ भावनांतून निर्माण झालेलं प्रेम व्यक्त करण्यासाठी डोळ्यांचं माध्यम किती प्रभावी असतं बघा! कुठल्याशा खेडेगावातील जुन्या पद्धतीच्या बंदिस्त स्नानगृहाच्या लाकडी चौकटीच्या फटीतून झिरपणारं तिचं ओलेतं सौंदर्य त्याला घायाळ करून गेलं आणि ते आपल्या दोन्ही डोळ्यांत सामावून घेत तिच्यावरील आपल्या प्रेमाचा इकरार दर्शविण्यासाठी तो गाऊन गेला-
'अपनी आँखों में बसाकर कोई इकरार करूं,
जी में आता है कि जी भर के तुझे प्यार करूँ...'
रफीने विलक्षण तन्मयतेनं गायलेलं त्याचं हे

बॅनर : मूव्ही टेंपल.
दिग्दर्शक : दिलीप बोस.
गीतकार : साजन देहलवी. कुलवंत जानी.
संगीत : श्यामजी घन:श्यामजी.
प्रदर्शन : मे १९७४.
कलाकार : बलदेव खोसा, अल्का, पूनम वैद्य, सुरेखा, जोगिंदर, शिवकुमार, मुमताज बेगम, सुंदर, वगैरे.
गीते :
१) छोड़ के सारी दुनिया को आई मेरे सावरिया...- सुमन कल्याणपूर.
२) पी पी पी ले... मतवाले दिलवाले, एक बोतल सौ प्याले... - कृष्णा कल्ले. गीतकार : कुलवंत जानी.
३) पत्थरदिल है ये दुनिया... ओ मेरी सुनले दीनदयाल, कर दे मुझको मालामाल... रफी.
४) मैं ढूंढता हूँ जिनको रातों को खयालों में... मुकेश.
५) अपनी आँखों में बसा कर कोई इकरार करूँ... रफी.

लडिवाळ सोलो त्याच्या समस्त नव्या जुन्या चाहत्यांना खुळावून गेलं. ते ज्या चित्रपटातलं आहे तो 'ठोकर' तेव्हाच डब्यात गेला. रुपेरी पडद्यावर हे अजोड गीत साकारणारा कोणी बलदेव खोसानामे सामान्य नट तेव्हाच अस्तंगत झाला. जिच्याकडे पाहून त्याने हे गाणं पेश केलं ती अलका नावाची नटी त्यानंतर काही नगण्य भूमिका करून कुठंतरी लोप पावली. या बहारदार गाण्याचं कल्पकतेने चित्रीकरण करणारा 'ठोकर'चा दिग्दर्शक दिलीप बोस अलीकडेच ही दुनिया सोडून गेला आणि या गीताचा जनक संगीतकार श्यामजी घन:श्यामजी त्याच्या हयातीतच एवढा उपेक्षित

स्मगलिंगचं काम करणारा. भोळसट शामू गिरधारीच्या भूलथापांना बळी पडून तेच काम करू लागतो आणि जेव्हा त्याला आपल्या अनैतिक कृत्याची कल्पना येते तेव्हा तो सरळ पोलिसांना बनारसीलालच्या सगळ्या अड्ड्यांची माहिती सांगून पाच हजारांचं बक्षीस मिळवतो. ते पैसे डॉक्टर अशोकला देऊन आपल्या बहिणीच्या ऑपरेशनची सोय करावी असा शामूचा बेत दुष्ट मुखियाच्या कारवाईने उधळला जातो. पण तरीही शामूकडून काहीही पैसे न घेता डॉ. अशोक राधाच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया करतो. परिणामी शामू त्याचा कायमचा ऋणी बनतो. वेळप्रसंगी जीवही

...निधन पावली, याच कोणालाही सोयरसुतक वाटलं नाही. वर्तमानपत्रात या दोघांच्याही निधनाच्या बातम्या कुठल्यातरी कोपऱ्यात छापून आल्या हाच काय तो दिलासा. पण त्यांनी दिलेलं ते सोलो मात्र अविस्मरणीय ठरलं.

आता 'ठोकर'च्या कथेसंबंधी सांगायचं तर कुठल्याशा गावात शामू (बलेदव खोसा) हा साधाभोळा युवक आपली विधवा आई (मुमताज बेगम) आणि अंध बहीण राधा (सुरेखा) यांच्यासमवेत राहणारा. त्याच्या गावात राहणारी बडबडी नटखट बिजली (पूनम वैद्य) त्याच्यावर जिवापाड प्रेम करतेय. पण याचं तिच्याकडे लक्षच नाही. त्याला एकाच गोष्टीचा ध्यास लागलेला. आपल्या बहिणीच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करून तिला चांगली करायची नि तिचं लग्न लावून द्यायचं. पण ऑपरेशनसाठी लागणारा पैसा शामूकडे नाही. शिवाय गावचा गुंडप्रवृत्तीचा मुखिया गंगू (जोगिंदर) याच्याबरोबर शामूचं वैमनस्य. त्यामुळे पैसे मिळविण्यासाठी शामू शहरात जायचं ठरवतो. तिकडे त्याचा मामा शादीलाल बँडवाले (सुंदर) राहत असतो.

डॉ. अशोक (शिवकुमार) हा शामूचाच गाववाला. पण शहरात जाऊन मोठा डॉक्टर बनलेला. तोच शामूच्या बहिणीच्या डोळ्यांचं ऑपरेशन करणार असतो. या डॉ. अशोकचं सीमा (अलका) या आईविना पोरक्या तरुणीवर प्रेम असतं. तिची सावत्र आई (ललिता चटर्जी) मात्र पैशाच्या लोभापायी सीमाचं लग्न शादीलाल या वयस्कर गृहस्थाशी करू पाहतेय. सीमाचा त्याला अर्थातच विरोध. शामूची शहरात नोकरीसाठी भटकंती सुरू असतानाच त्याला त्याच्या गावचा गिरधारी नावाचा तरुण भेटतो. त्याचा शहरी थाटमाट भोळ्या शामूला भुरळ पाडतो. हा गिरधारी कुणा सेठ बनारसीलाल (राजन हक्सर)कडे द्यायला तयार होता.

दरम्यान डॉ. अशोकला सहा महिन्यांसाठी लंडनला जावं लागतं. या गोष्टीचा गैरफायदा सीमाची सावत्र आई घेते आणि दोघांमध्ये बेबनाव निर्माण करते. डॉ. अशोकने तिकडे लग्न केल्याचा गैरसमज होऊन दु:खी झालेली सीमा घर सोडते आणि नेमकी शामूच्या गावात येते. तिथे दुष्ट गंगूच्या तावडीतून शामू तिची सुटका करून आपल्या घरी आणतो. पण त्याला ही डॉक्टर अशोकची प्रेयसी असल्याची कल्पना नसल्यामुळे तो स्वत:च तिच्या प्रेमात

आशा भोसले य

पान १ वरून ➤ मोठी बहीण लता मंगे[illegible] यांच्या महान कर्तृत्वाच्या सावलीतही त्यांनी अ[illegible] आवाजाचा अमीट ठसा उमटवि[illegible] गानकारकीर्दिला ५७ वर्षे पूर्ण होउ[illegible] आशाबाईंचा आवाज नव्या पिढीलाही तित[illegible] आपलासा वाटत राहिला. पाश्चात्य पॉप गायक [illegible] जॉर्ज याच्या बरोबर इंग्रजी हिंदी गाण्यांची सरमि[illegible] करण्यासारखा आगळा प्रयोगही त्यांनी केला. आजवर आशाबाईंनी सुमारे १२ हजारांहून अ[illegible] गाणी गायली असून त्यात आठ हजार [illegible] १२०० मराठी आणि ४५० गुजराथी गाण[illegible] समावेश आहे.

ही अतिशय आनंदाची बाब - लता

पुणे- आशाला फाळके पुरस्कार देण[illegible] निर्णय घेण्यात आल्याबद्दल मी खूप आनंदित [illegible] आहे. उशिरा का होईना तिच्या गेल्या कि[illegible] वर्षांच्या संगीतसेवेची सरकारने दखल घेतल[illegible] समाधानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया स्वरस[illegible] लता मंगेशकर आणि हृदयनाथ मंगेशकर [illegible] व्यक्त केली.सुप्रसिद्ध पटकथा लेखक व कवी [illegible] अख्तर यांनी आशा भोसले यांना दादा[illegible] फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल अतिशय [illegible] व्यक्त करताना म्हटले की, ही तर केवळ सु[illegible] आहे. अजून खूप पुरस्कार आशाजींना मि[illegible]

अपनी आँखों में बसाकर...

ठोकर

पडतो. शामूच्या घरचेही सीमाला आपली भावी सून म्हणून पसंत करतात. पण सीमाला ते शक्य नसतं. तिचा डॉ. अशोकमध्ये जीव गुंतलेला. शामूशी तिचा बळजबरीने विवाह ठरवला जातो. त्या लग्नाला डॉ. अशोक हजेरी लावतो आणि सीमाला तिथे पाहून चक्रावतो. शामूला डॉ. अशोक आणि सीमा यांच्या प्रेमाची कल्पना येते आणि मोठ्या मनाने तो

संगीतकार श्यामजी घनश्यामजी

डॉक्टर अशोकला त्याची सीमा देऊन टाकून त्याने केलेल्या ऋणातून अंशत: मुक्त होतो. शामूचं लग्न मग त्या नटखट बिजलीशी होतं. 'ठोकर'ची कथा फारशी नावीन्यपूर्ण नव्हतीच. पण त्या काळात 'ठोकर' पाहिला गेला तो केवळ रफीच्या त्या लोभसवाण्या सोलोसाठी. अवघ्या दोन कडव्यांचं हे गाणं गीतकार साजन देहलवीच्या लेखणीतून उतरलेलं. अत्यंत साध्या-सोप्या रचनेतून नायकाने व्यक्त केलेलं प्रेम ही त्याची खासियत. पहिल्याच कडव्यात नायकाने केलेली अपेक्षा बघा-

'मैंने कब तुझसे जमाने की खुशी माँगी है
एक हल्की सी मेरे लबपे हँसी माँगी है...
सामने तुझको बिठाकर तेरा दीदार
करूँ...'

या गाण्याला तेवढीच सुंदर चाल लावणारा श्यामजी घन:श्यामजी हा तसा उपेक्षित संगीतकार म्हणावा लागेल. गायक होण्याच्या वेडापायी तो इंडस्ट्रीत आला होता. पण दादा बर्मननी त्याचं गाणं ऐकून त्या गाण्याची चालच पसंत केली आणि त्याला 'संगीतकार हो' असा सल्ला दिला. बऱ्याच प्रयत्नांनंतर निर्माते किशोर साहूंनी त्याला आपला 'धुए की लकीर' चित्रपट दिला आणि श्यामजीची कारकीर्द सुरू झाली. पण दहा-बारा चित्रपटांपलीकडे ती जाऊ शकली नाही. कारण चांगल्या चाली देण्याची क्षमता असूनही श्यामजी घन:श्यामजीचा उदय झाला तो अँग्री यंग मॅन अमिताभच्या झंझावाती काळात. तेव्हा संगीत नगण्य ठरलं होतं आणि त्याचा अखेरचा चित्रपट 'लाल चुनरिया' (१९८३) जेव्हा पडद्यावर आला तेव्हा बप्पी लहरी, इंदीवर, जीतेंद्र आणि श्रीदेवी यांचा सावळागोंधळ सुरू होता. तरीही श्यामजींनी आपली चुणूक वेळोवेळी दाखविण्याचा प्रयत्न केला. बाकी सोडा. पण निदान रफीच्या या अजरामर सोलोसाठी तरी या गुणी संगीतकाराला दाद द्यायलाच हवी.

■ विजय शिंगोर्णीकर